१२८

इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ धुळें.



—: हस्त लिखित ग्रंथ संग्रह :—

ग्रंथ क्रमांक ४८/१२८ (८८८)

ग्रंथ नांव सोनपत पानपत येथील लढाईची हकिगत.

विषय म० गद्य.

"Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

(1) १/ख १२८

Unpublished

Sonpatt
Panipat
Bakhar A

३॥

To Marathi ... [illegible]

Where these individual were or not, they are imaginary persons cannot be ascertained

सोनपत पानपत येथील ल-
ढाईची हकीगत.

१/ख १२८

This was given ... by Abaji Vishnu Kathvate — January 78

This was copied by or under my superintendence from a very badly written original

This compares to a great extent with अंताजी माणकेश्वर's Bakhar

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

श्रीग० (2)

अश्री अश्री
रा॰ या विराजित राजमान्य रा॰ मोरो हरि-
स्वामींचे शेवेशी.

पोष्य नागो सखाराम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति उपरी
येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन आज्ञा केली पाहिजे -
विशेष आपण लिहिले की श्रीमंत भाऊसाहेब यांची खबर लिहून
सर्व हकीगत समजावी त्यावरून लिहिले असे तरी दक्षिणदेशीं
श्रीमंत नाना साहेब व श्री० भाऊसाहेब व श्री० दादा साहेब यांनीं कर-
नाटका पर्यंत, तमाम गुजराथ अटक वगैरे मुलूख काबीज करून
रयत धारी वऊयाहा दारी पहिल्या जमाच्या पादशाहा पेक्षां दस
पट हिशानें दुनियास आराम देऊन आपले इनसाफ चालविले. हिं
दुधर्म कलीयुगांत मलीन जाहाला होता तो आपले प्रतापाचे तेजानें
उजेडीन गोब्राम्हणांचे संरक्षण व पृथ्वीचें पालन यथानुक्रमें प-
हिल्या युगां प्रमाणें चालवितें जाहाले. पुढें कली सबाधक ~~जाहाले~~ झाले लागले,
याजकरितां कली पुरुषे यावनाचा मदतगार दिल्लींत आ-
लीगौर पादशाहा होता तेथें संचार करून हिंदुलोकांची जबरी-

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

3 (3)

जाहाली. मारण्या विशी अनेक प्रकारच्या कल्पना करूं लागले.
तें समई मुसलमानांनीं सुभे पादशाही मुलखावर बंदोबस्तास-
होते प्राणी अली गोर याचे नजाबयांत अर्ज्या किल्ल्याकीं मरा
ठे गनीमयास तमाम मुलख व नामी शहरे व बांके बिकट गड किल्ले
घेतले. याचे जवांमर्दीची समशेरीचा मुकाबला कोणी करूं शक
त नाहींत हल्लीं पादशाहीस पोखून मुलख मुसलमानी गार
द होण्याचा जमाना आला आहे. [illegible] फौज-
कदीम फौज जमा करून जलदीन ठेविली आहे तरी मुसल-
मानी दीन कायम राहील [illegible] सल्ला काय तें सांगा. दीन
काईम राहील, पठाव बाहादर याचीच पादशाहीत होईल त्याप्रमाणें-
अलीगोर यांनीं गनीमाचे दहशतीच्या [illegible]राचे अर्जदास्त लेहून
अधीच ~~सब~~ हवाल जाहल्याहोता त्यांतही खबर ऐकून शाहा-
ज्यानाबादच्या पादशाहा बहुतच फकीरीच्या दर्यांत गेला
आणि तमाम सल्लाहकार दाना खावंद मुसाहेबां खेरं दरबे
व वजीर मुरसद तबीरव अमीर उमराव सल्लाहकारहो-
ते त्यास बोलावून आणून झाडून हकीगत बयान केली-
कीं मराठ्याच्या हातून मुसलमानी राहणें मुसकील आहे.

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

यांचे बंदोबस्ताची तदबीर सांगणें त्याजवरून सर्वांनी सल्लाहा
दिल्हा कीं बिबि मलका यास बोलवून मन खुश करावा. का
य सल्ला देतील तो पहावा. मग अर्जबेग पाठवून तिजला बो-
लावून आणिले आणि पुसों लागले कीं गनीमांनीं तो मुलूख हैराण केला. तुम्हीं आम्हांस वडील माणस बुनरूख अ
हां तरी या गोष्टीची सल्ला कायती सांगावी. मुलूख तो दरो
बस्त —

" Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

किल्ले (5) बाहेरील

मोठे मोठे शहर दरयांतील कुल घेतला. आणि पादशाई घेणा
र याची कोणती सल्ला करावी हें वर्तमान सर्वांचे मुखें ऐकून-
मल्का जमानी म्हणू लागली तुम्ही स्वस्थ असावे मी कंबर बां-
धिते आणि गनीमास तंबी पोहचविते तरी मल्का जमानीन ख-
री. ऐसा पराक्रम सर्वांस सांगून उठून आपल्या रंग माहालास-
जाती झाली. नंतर तमाम अमीर मनसुबेदार आपले डेऱ्यास जा-
ते झाले. मग पादशहास सणीनें चंद्र रोज १ माहे सफरचे रोजीं रूस-
शामचे पादशाहास एक परवाना बहुत नरमीचा लिहिला. कुलकि
ल्ले व मुलुख गणी मानें घेतला पादशाई तक्त हि राहून घेणार आ
हे. पुढें मोंगलाई निरधुक बुडती होणार तरी पादशाहा साहेब मे-
हरबान होऊन आम्हांस कुमक पाठवून द्यावी. यांगो टीची हायग-
य न करावी जो पैसा लागेल तो पुरो पाउं खर्चाचे विषयीं कांहीं चिंता
न करावी. जर करितां कुमक न पाठविली तर तुरकानी पादशाई-
गारत होईल राहत मोंगल बुडतो. मुसलमानी कलमाची शरम-
आपणास आहि असें स्पष्ट आणून लिहिले कीं जयादा पन्हानी मे-
हरबान होऊन कुमक जबरदस्त पाठविली पाहिजे. साहेबाचे-
भरवशावर ~~दम दिला असे~~ शावर बसलों आहो असा परवाना-
बहुत नरमीचा लिहून सांडणी स्वार तयार करून रवाना केला.
सांगितलेंकीं जाब लौकर घेऊन आल्यास इनाम दिला जाईल-
नंतर सांडणी स्वार मजल दर मजल करीत खानजाऊन पंधरा

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

वे दिवशीं रूमशामचे पादशाहास आऊन भेटला. पादशाहास मुजरे-
करून मलका जमानीचा परवाना पुढें ठेविला; पादशाहनें वाचून-
पाहून हाकीकत दरोबस्त ध्यानास आणून आपले अमीर व वजीर-
पठाण व
व उमराव, व मनसुभेदार होते त्यास बोलावून दरबार करून बसले.
सर्वत्रांस पादशाहानी शहर दिल्लीचें वर्तमान सांगितलें. पादशाई-
दी।
आली मलका जमानी नामें करून तिचा परवाना सांडणी स्वार घेऊ-
न कुमक मागावयास आला आहे. त्यास त्याचा सल्ला कसा काय आ-
हे. त्यास सल्ला काय देतां मनसुभेदारांनीं अर्ज केला कीं ही गोष्ट-
बरी जाहाली नाहीं. मुसलमानी सर्व बुडत चालली आहे. मुसल-
मानीची शरम धरून कुमक बरोबर देऊन रवानी करून गनीमास तं-
बी पोहोंचली पाहिजे. असा अमिरांनीं सल्ला देऊन शाहा गिलच्या
पठाण कुलजमीयत घेऊन दक्षणेस शहरदिल्लीस जाऊन गनी
मास तंबी पोहोंचवून पादशाई तक्त कायम करून, मुलख त्याचा-
बंदोबस्त करून यावें असा हुकूम करून शिरपाव देऊन बि-
दा केला. शहानें पादशाहास कुर्निसा करून आपले महालास येऊन
आपली कुल फौजेस ताकीद करून तमाम अमीर आपले सरंजा-

" Joint Project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

मा निशी तयार होऊन शाहा समागमे फौज सुमारें तीन लक्ष पायदळ-
३००००० 
व अरब सुमारे एक लक्ष, तोफा सुमारे , व बाणाचे उंट एक हजार-
१००००० ५० १००० 
व सुतार नाळ्याचे उंट सुमारे आठसें, जंबूरयाचे उंट सुमारे पांचसे.
८०० ५०० 
दारु गोळ्याचे बैल सुमारे पंचविस हजार, चालते वजीर व खोजे असे
२५००० 
सामानाचे उंट बरोबर भरून घेतले सुमारे ९००, शिवाय बाजार-
बुणगे घेऊन मजल दरमजल कूच करून पंधरावे रोजी यमुने-
चे तिरीं येऊन उतरले आहेत. जोमुलुख बद्दल खराब केलाही
खबर आली गोर पादशाहास व मल्का जमानी बीबी जाहिर
झाले. खुषवक्त होऊन अमीर उमराव व दौलतदार यास तलब
करून शाहाचे भेटीस चालले शाहाची भेट घेऊन नजर नजरा-
णें पेशकशा गुजरऊन गनीमाचा जोर झाल्याचाही च्यार लाख
घोड्या शिवाय तोफा सुमारे ९००, सुतार नाळ्याचे उंट ७००, अरा
ब सु० १५०००० पंधरा लक्ष, वगैरे सरंजाम घेऊन शाहाचे लष्करां
त उतरला. ही खबर राजेश्री दत्ताजी शिंदे मारवाडांत पाटण-
डाचे मुकाबल्यावर मोहीम जाहाली होती तो रोख सोडून वि-
लायतवाल्याचे फौजेवर चालून आले बरोबर स्वार असा
मी सु० १२५००० सव्वा लक्ष, व तोफा आराबा सुमारे ५००० प-
न्नास हजार घेऊन जंगी सरंजामानिशी दिल्लीच्या मैदानांत-
येऊन उतरले ही खबर शाहाने ऐकतांच गिलच्याचा पठान-
नामे व सरदार होता त्यास हुकूम दिल्हा कीं पेशवे बाहादुरा-

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

चे अमीर दत्ताजी शिंदे ज्याहा मर्दमऱ्हाटे आहेत, आपले सरंजा-
मानिशीं यमुनेचे दक्षिण तिरीं येऊन उतरले आहेत तरी तु-
म्ही विलायती मोंगलाचा सरंजाम त्याचा सरंजामाचा इरादा इ-
तकी फौज गनीमी करावयाची आहे मोंगलाच्या सरंजाम बक्कवा-
र वजीर व टोप फास फंग आदा करून मुकाबला करून करणे-
शाहाच्या हुकूम होतांच हा गान मजकूर निशाबाज्याऊन प्रति-
ज्ञा केली कीं मीम शाही याचे सरदाराचे शीर कापून घेऊन येईन-
नाहींतर मजवर तलाख आहे असे बोलून फौज सुमारे ५०००० पन्नास हजार तोफा सु० २०० दोनशें व बाणाचे उंट ३०० तिनशे-
सुतार नाल्याचे उंट ४०००० चाळीस हजार घेऊन यमुनेचे दक्ष-
ण तीरीं आला दत्ताजी शिंदे यास खबर जाली जाहली कीं कु-
तुबशाहा गिलच्या आम्यावर येत आहे असे समजल्यावर-
जनकोजी शिंदे यास बोलावून हुकूम केला कीं तुम्ही स्वार पन्नास हजार ५०००० व आराबा व पायदळ व तोफा व सुतार नाल्याचे उंट-
व बाणाचे उंट वगैरे घेऊन दुसमाचे फौजेशीं लढाई मुकाबला-
करणें त्याणें आपली मऱ्हाटी फौज तयार करून कुतुबशाहा-
चा मुकाबला केला- तरवारीची लढाई याची व मऱ्हाटे फौजेची
तीन प्रहर पर्यंत लढाई तरवारीची जाहाली. गिलच्याकडील शिपाई खेतात पडले व जखमी जाहाले ४००००

"Joint project of the Rajawade Samshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

चालीस हजार परंतु मोंगलाचे फौजेंत आराबाचा सरंजाम भा-
री होता याजकरितां मराटी फौजेनें विलायतवाल्यांचा मार-
[मा?]
न साहावाकीना राहीलातो आकस्मात जनकोजी शिंदे-
यास बाजूवर गोळी लागून त्याजखेनें घोड्याखालीं आले फौजें
त सरदार होते यांनीं आपला सरदार घोड्याखालीं आलाहेंपा
हून फिकीरीनें पडले ही खबर दत्ताजी शिंदे यासजाहीरहोतांच-
बहुतकष्टी होऊन बोलों लागले कीं आतां श्रीमंत नानासाहेब-
यास काय तोंड दाखवावें या स्थिती मध्ये अगर मुसलमानास-
मारणें या शिवाय दुसरा विचार नाहीं जेणें करून आपला नक्शा-
राहील असें करणें हा बेत पक्का करून बख्तर व शिरटोप आं-
गांत घालून लोकास व सरदारास वजीर व टोप चिलखातें
पोशाखवांटून देऊन घोड्यावर स्वार जाहले. मुकामावरफौ
जतयार करून व तोफा व बाणांचे उंट व सुतारनाल्याचे उंट व-
दारूगोळा व पायदळ व आराबा आच्यानक असमानी आ-
फ्री प्रमाणे दोड करून शहारास गांठून यांनी लढाई सुरू केली चार-
प्रहर समशेरीची कतल ऐकसारखी जाहाली मराठी लोकयांणीं-
जिवाची बेतमा धरून आपले आंगांत जवामर्दीचे जवाहीर होते
ते दुसमानास दाखवूं लागले परंतु विलायतीची स्वाधीश आज-
ब याजकरितां मर्दलोकांची जेरदस्ती होऊन आराबयांचेमा
रानें विलायतवाले समस्त असतां त्यांची जबरी होऊन मराटे-

Joint project of Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

फौजेचा खराबा केला. विलायतवाल्या कडील लोक खेतात बराहि-
ले व जखमी आहले सुमारे ४०००० चाळीस हजार व मऱ्हाटी याज
कडील खेतात बराहिलेले सु० २५००० पंचवीस हजार परंतु दत्ता
जी शिंदे यास गोळी माथ्यावर लागली तेणें करून त्यानें शा-
हाजानें फौजेंस सोडून स्वर्ग लोकाचे कचेरीस जाऊन बसले-
बाकी फौज लोक होते त्यांनीं आपला खावंद जातां पाहतांच-
जनकोजी शिंदे जखमी होऊन पडले होते मोठे मोठे सर-
दार वगैरे लोक राजेश्री दत्ताजी शिंदे यांच्या मुडदा र-
णांत पडला होता. पाठभाग यांस घेऊन निघाले मग दत्ताजी
शिंद्याचें दहन यमुनेचे करेस केले. मग कुचदर कुच जन-
कोजी शिंदे यास घेऊन रमलीचे करेस जाऊन राहिले बर-
कूड लोक जिकडे रस्ता सांपडला तिकडे हकले यो प्रमाणें-
मऱ्हाटी फौजेचा खराबा आहला. गिलच्याचे लोकांनीं शाहा-
जानें वाचून आपले लष्करांत गेले त्यानंतर खबर राजेश्री-
मल्हारजी होळकर जयनगराचे मैदान्यांत होते त्यासही-
हकीगत समजली, दत्ताजी शिंदे फौजेसमवेत गिलच्यानें-
लढाई करून बुडविले. शाहा गिलच्या रूमचे मुलखांतून आ०

Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. " Joint project of the "

सांगाते फौज ३००००० तीन लक्ष घोडा बाजार बुणगे आराबा पा-
यदळ सु॥ १५०००० दीड लक्ष, बाणांचे उंट ७००० सात हजार. तप
शील वार वर्तमान मल्हारजी होळकरास समजले. मग तमाम
सरदार, पागे, मनसुभेदाराशीं वगैरे बोलावून विचार सर्वध्या
नास आणून दत्ताजी शिंदे यांचें वर्तमान साकल्य सांगितलें, आ-
णि म्हणूं लागले कीं या गोष्टीचा सल्ला दिला कीं समरांत फौज घे-
ऊन पुढें जावें नंतर येश अपेश ईश्वराचे स्वाधीन आहे. परंतु ए-
कदा मुकाबला घेऊन पहावें. असें सरदाराचें वचन ऐकतांच-
मल्हारजी होळकर यांनीं स्वारी तयार करून बाहेर सरंजामनि-
शीं चालिलें बरोबर फौज १२५००० सवालक्ष पायदळ आरा-
बा सु॥ ५५००० पंचावन्न हजार व नौका सुमार ४०० चारशें व सु
तार नाल्याचे उंट सु॥ ५०० पांचशें व बाणाचें उंट ७०० सातशें व-
जंबुरक्याचे उंट ४०० शें, डेरे व टोप व चिलखाजे व बरूतोरे बरोबर-
भरून घेऊन सु॥ उंट २०० दोनशें खेरीज बाजार बुणगे घेतले. मज
लदर मजल पंधरावे दिवशीं शहर हस्तनापूर येथें आले. हें वर्त
मान आलीगौर पादशाहास वकिल्यास जाहीर जाहाले. पेशवे-
बहादर यांचा अमीर नामें होळकर आले आहेत समागमें कु-
ल जमीयत फौज मारतीधारकरी सु॥ २००००० दोन लक्ष याशि
वाय तोफखाना सरंजाम बहुत आहे. त्त शहानें आपला सरदार
कुतुबशाव अबदुल खान गिलच्या पठान या दोघांस हुकूम

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan Mumbai

केला कीं तुम्ही आपली कुल जमीयत घेऊन गनीमावर जाणे-
असें ऐकतांच दोघांनीं फौज घेऊन सरंजामा निशीं चालले -
आराबाव पायदळ सुमारें ५०००० पन्नास हजार बाणाचे उंट सु॰
८०० आठशे सुतारनाल्यांचे उंट सुमारें ५०० पांचशे जंबुऱ्याचें
उंट सु॰ ७०० तोफा सु॰ ३०० तीनशे, जीरं बखतर व टोप सीले
पोख्त यांचे उंट बरोबर भरून घेतले सु॰ ९०० नऊशे घेऊन हो
ळकरावर चालिले; बरोबर फौज ३५०००० लक्षदीड. यमुनापार-
पार आले. हें वर्तमान मल्हारजी होळकरास कळलें. तमाम स-
रदारास ताकीद करून बोलिले कीं गिलच्या आपल्यावर-
येतो तरी तुम्ही आपले सरंजामानिशीं तयार असले पाहि-
जे. गिलच्याच्या बरोबर लढाई करून मरणें अथवा मा-
रणें हक्क आहे परंतु समशेरीचा हात त्यास दाखवून असें हो-
ळकर बोलिल्यानंतर स्वारी तयार करून बंदोबस्त फौज चालली. दं-
ली तोंतिकडून कुतुबशाहा अबदाल्लीची फौज आली त्याच्या-
फौजेच्या मुकाबला जाहला तो तीन प्रहर पर्यंत लढाई मात-
बर जाहाली, घोड्याची सुंथ कत्तल जाहाले याप्रमाणें लढाई हो-
ऊन गिलच्याकडील खेतात फौज व पायदळ सु॰ ५०००० पन्ना

Joint Project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

सहजार खेतांत राहिले व होळकराला कडील फौज सु० पायदळ सु० २५००० पंचवीस हजार पडले ते पत्री लिहिता पुरवत नाहींत. परंतु गिनीमाचा हर्षकाल तेणेंकरून गिलच्याचा जोर होऊन गनीमानिशीं कस्त खादली बहुत शिपाई गिरीचीशर्थ होऊन गेली परंतु कांही केल्यानें गिलच्या आटोपेना. हर एक गोष्टीची कमती होऊं लागली. सुभेदाराच्या लष्करानें पळ काढिला हें पाहून मल्हारजी होळकर यांनी विचार केला कीं सालमजकुरी आपला जय होता दिसत नाहीं तमाम फौज पळूं लागली हें नजरेनें पाहून सुभेदारांनीं रणमंडळ टाकून पळ काढला लष्करचे लोक पळूं लागले आणि गिलच्यानें बहुत मार दिला आणि मारीत मागें लागले दहा पांच कोसावर मुक्काम येईलतोपर्यंत बहुत मारली गेली लोकांची बहुत खराबी जाहाली फौज २०००० विसहजार जागोजाग पडले व रा० मल्हारराव होळकर मर्दी मर्दी निघोन मजल दरमजल कुंभेरीस दाखल जाहाले. सुरजमल जाट होता त्यास हें वर्तमान कळलें कीं मल्हारजी होळकर गिलच्याचे लढाईंत पराभूत होऊन आपले शहरास आले आहेत असें ऐकून सुरजमल जाट म्हणूं लागला कीं आपल्या मित्रावर वखत गुजरला आहे तरी आपण जाऊन सन्मान केला पाहिजे असें बोलून स्वारी तयार

सामोरा जाऊन मल्हारजी होळकाराची भेट घेतली. आवल
तागाईत आखेर पर्यंत वर्तमान गिलच्याचें जाहालें ते निवेदन
केलें. गिलच्या तमाम मुलूख घेतो त्याच्यापुढें कोणाचें चाल-
त नाहीं पुढें निर्वाह करणार समर्थ त्याशीं तुम्ही सरदार-
बहुता दिवसाचे आहात तरी आम्हास मुकाम करावयास
चार दिवस जागा दिली पाहिजे. मग सु॰ज॰म॰जा॰ म्हणं-
लागलेंकीं तुम्ही आमचे बंधु आहांत ही गोष्ट आपणास म्हण
मन जरी म्हणावें त्याची नाहीं. मी सर्वस्वी आपला आहे. चाकरी
फर्मावाल ती बजाऊन दाखवीन याची फिकर न करणें खात
र जमा राहावी. आपल्या पुढें गिलच्या म्हणजे काय माणूस-
मार अगर मरं ऐसा दिल दिलासा दिला. हत्ती धरून कुंभ
रीस घेऊन आले. रा॰ मल्हारजी होळकरास नजर वस्त्रें दे
ऊन गांवाच्या बाहेर मैदानांत जागा देऊन उतरविलें. आ-
णि हकीगत हिंदुस्थानची जाहाली. मग अंताजी माणकेश्वर हस्त
नापूरचा वकील यानें ही जाहालेलें वर्तमान कुल हकीगत लेहून-
सांडणीस्वार श्रीमंत राजेश्री नानासाहेब व भाऊसाहेब व दादा-
साहेब याजकडे रवाना केला. व रा॰ मल्हारराव होळकर यां-

" Joint Project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

नींही झालेलें वर्तमान तपशीलवार लिहून सांडणीस्वार रवाना-
केला. तो पंचविसावे दिवशीं येऊन नाना साहेबांचे लष्करांत दाख-
ल जाहाला. तो दक्षणेंत सलाबतखान व निजाम आली सुभेदक्ष-
णेचे पादशाई होती, तिशीं लढाई करून जरदेस्तात आणून साठी
लक्षांची जाहागीर घेतली आणि माघोरे बंने गांवीं आले होते तो-
इतक्यांत सांडणी स्वार येऊन दाखल जाहाला. त्यानें अंताजी मा-
णकेस्वर व मल्हारराव यांचीं पत्रें वाचून पाहिलीं. याजवरून हिं-
दुस्थानचें वर्तमान जालें तें वाचून हकीगत ध्यानांत आणून-
विचार करून दिलगीर जाहाले आणि म्हणूं लागले कीं दत्ता-
जी शिंद्यासारखा मोहरा होणार नाहीं असा मर्द माणूस-
फौजेसमवेत खराब होऊन कामास आला बहुत लोकांचें-
घर बुडविलें. मल्हारजी होळकरांनीं सिकस्त खाऊन कुंभेरी
स आले. मुलूख दरोबस्त जातो, काल विपरीत आला सादि-
सतो; बरें जें ईश्वर करील तें खरें. मग तिघे बंधु मसलत-
करून तमाम शिलेदार व पागे सरदार बोलावून आणिले.
श्रीमंत नाना साहेबांनीं होळकराचीं व अंताजी माणकेस्वराचीं

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

पत्रें वांचून दाखविलीं; तमाम सरदार वगैरे येऊन पत्रें ऐकून-

बहुत दिलगीर जाहले. ते वेळां नाना साहेब म्हणू लागले कीं यागो-

ष्टीचा सल्ला कायदेतां? हिंदुस्थानचा मुलूख अर्धा गिलच्या-

नें घेऊन सरदार फौजे सुध्धां बुडविले. शिंदे तर सर-

कारचे कामास आले. होळकर सरकारचे सरदार यांनीं सि-

कस्त खाऊन कुंभेरीस गेले. असें तमाम सरदारांनीं ऐकून-

म्हणूं लागले कीं आमचे समागमें श्रीमंत दादा साहेबास द्या

वे. गिलच्या म्हणजे पदार्थ किती? तो मारून गारध करून

साहेबनशा राखा. असें लोकांचें बोलणें ऐकून श्रीमंत नानासा

हेबांनीं दादा साहेबास आज्ञा केली कीं तुम्ही आपले फौजे-

निशीं हिंदुस्थानचे मोहिमेस जाणे. तिकडे मोंगलांनींच-

टाई करून सरकारचे फौजेवर शेहर होऊन मुलूख खरा

ब केला; फौजा मारल्या गेल्या, आणि मल्हारजी होळकर यां-

नीं तुम्हास बोलाविले आहे पहिली तुमची ज्याहा मर्दी-

व शत्रूवर जरब बसली आहे. पहिल्या मुलुखगिरींत-

तमाम शत्रु पादाक्रांत झाले यास्तव जलदस्वार होऊन जाणें

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

ते समई दादा साहेबांनीं विनंती केली कीं मजला खर्चास कांहीं
द्यावें असा भाव सान्ह करितां भाऊसाहेब बोलिले कीं लोकमुलूख
गिरीस जाऊन फौजेचे खर्च वारून खजीना आणितात. आणि-
तुम्ही मोहिमेस जाऊन उलटे कर्ज घेऊन येतात. हिंदुस्थानचा-
मुलूख मातबर संस्थानें व राजवाडे यांचे खंड व याचा पैका मुबल-
क येतो - तुम्ही खावंद अहात. इतकी गोष्ट ऐकताच श्रीमंत दा
दासाहेब भाऊसाहेबास बोलिले कीं आपण मुलूख गिरीस-
जावे, आमचे काम नाहीं याप्रमाणें श्रीमंत भाऊसाहेब मुलू
ख गिरीस जावयास सिद्ध जाहले श्रीमंत सौभाग्यवती माता
श्री गोपिकाबाईनें आऊन बहुत प्रकारें सांगितलें कीं श्रीमंत
रा॰ दादासाहेब व विश्वासराव जातील - यांचेही वचन मान्य न क-
रितां दुसरे दिवशीं फौज निवडून समागमे घेतली बीतपसी-
ल श्रीमंत विश्वासराव पेशवे घोडेस्वार सुमारें २५००० पंचवीस
हजार हुजरात वगैरे पागा पंच्याहत्तर हजार व समशेर बहादर फौ॰ सु॰
७५००० २५०००
पंचवीस हजार ; व यशवंतराव पोवार यांची फौज सु॰ १५००० हजार
व दमाजी गायकवाड यांची फौज ६०००० साठ हजार. व इब्राजी-

Joint Project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

जी कदम यांची फौज सु० ५०००० पन्नास हजार. धाकटे नानासा-
हेब सासवडकर यांची फौज सु० २५००० पंचवीस हजार. व ब-
ळवंतराव सासवडकर यांची फौज सु० २५००० पंचवीस हजा-
र. व आप्पाजी जाधव वाघोलीकर सु० ५००० पांच हजार. व तु-
कोजी शिंदे सु० १०००० दहा हजार. व त्रिंबकराव मेंढरे सु०
पाच हजार. रेनकोपंत सु० ५००० पांच हजार आणि कित्ती-
एक सरदार होते सु० ५०००० पन्नास हजार व तोफा सु० ७००-
सातशे व बाणाच्या कैच्याचे उंट सु० १००० एक हजार व सुता-
रनाल्याचे उंट सु० ५०० पांचशे व आरावा पायदळ सु० ६००००
साठ हजार वजीर वकील थोपसील ख्वाजे यांचे उंट बरोबर घेऊ-
न सु० ७०० सातशे बैल सरंजाम सु० सु० ४००००० चार लक्ष घे-
ऊन श्रीमंत नानासाहेबास नमस्कार करून श्री तुळजापूर ते
मुक्कामीहून मजल दर मजल पंचविसावे दिवशीं नर्मदा-
तीरास दाखल जहाले. तो मल्हारराव होळकर याची फौ-
ज सु० १५०००० दिड लक्ष बरोबर होती. कुंभेरीस होते त्या

जला वर्तमान समजलें कीं श्रीमंत महाराज पाथीराज भाऊ-
साहेब सुरजभेलशास निकडीनें दरकूच येतात हें समजलें. म-
ल्हारजी होळकरांनी कुंभेरीसहून पत्र पाठविलें कीं बाजारबु-
णगे घेऊन ग्वाल्हेरीस रहावें आणि सड्या फौजा मजल्याकडे र-
वाना करण्या विषयीं आज्ञा व्हावी म्हणजे सुरजमल्ल जाट मी अ
असे दोघे मिळून गिलच्यावर जाऊं म्हणजे आपला श्रम-
राहील कीं सरदार मागेंच आहेत असा गिलच्यास हिदाब-
घेऊन हें पत्र सांडणीस्वार याजबरोबर भाऊसाहेबाकडे रवा-
ना केलें. मजलदरमजल करीत सांडणीस्वार लष्करांत आऊन
पोहोंचला. पत्रें गुदरलीं. तीं वाचून ध्यानास आणून रा॰
बळवंतराव साडकर बोलावून होळकराचें पत्र दाखविलें-
आणि सल्ला पुसो लागले. आपण मागें राहिला आणि सरदार
पुढें रवाना केले तरी कांहीं सरदार लढाईस तड देणार नाहींत-
आणि खावंद यणावाचून लढाई फत्या होणार नाहीं. याजकरि-
तां आपण समक्ष असलें पाहिजे. कोणाची गोष्ट खातरीस न आ-
णितां जोंवरी गोष्ट अनकूळ नसतां कूच करून राजश्री जनकोजी-
शिंदे चमेलीचे कडेस होते त्यास भाऊसाहेब तेथें येऊन जन-

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

## मूळ प्रत पाहण्यासाठी संपर्क

**इतिहासाचार्य वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे**
राजवाडे पथ, गल्ली नं. १, धुळे-४२४००१ (महाराष्ट्र)
**दूरध्वनी क्रमांक** (०२५६२) २३३८४८
**Email ID** : rajwademandaldhule@gmail.com